# <u>परमपूज्य काकामहाराज यांच्याशी झालेली चर्चा</u>

## <u>१६ डिसेंबर २०११</u>

१६ डिसेंबर २०११ यादिवशी‘ सेल्फ अवेकनिंग’ (**http://mahayoga.org/selfawakening.htm**) या न्यूजलेटरचे श्री दिलीप कामत (संपादक) यांना प.पू.काका महाराजांबरोबर त्यांच्या नाशिक येथील निवासस्थानी काही तास बसायचा चांगला योग लाभला आणि त्यांच्याशी महायोगाविषयी चर्चा झाली. यावेळेस आमच्याबरोबर नाशिक येथील प.पू. प्रभुणे महाराज व श्री निखिल प्रभुणे दोघेही होते. प.पू. काका महाराजांचे वय होते आहे; असे असूनही साधकांशी संवाद साधण्यासाठी व महायोगाचा प्रसार सर्व जगात व्हावा यासाठी काका महाराजांचा उत्साह नेहमीप्रमाणेच राहिला आहे. या चर्चेचा भाषांतरीत व संपादित भाग खालीलप्रमाणे आहे. प.पू. काकामहाराजांबरोबर झालेली ही चर्चा ’सेल्फ अवेकनिंग‘ न्यूजलेटरच्या फेब्रुवारी २०१२च्या अंकात प्रथम इंग्रजीत प्रकाशित झाली होती.

संपादक - प्रिय गुरूदेव, मी आपले आभार मानतो की आपल्या सेल्फ अवेकनिंग या तिमाही ई-न्यूजलेटरच्या वाचकांच्या वतीने मला आपल्याबरोबर महायोगाविषयी चर्चा करण्याची ही संधी आपण मला दिलीत. आतापर्यंत आपण तीन वेळा अशाच प्रकारची चर्चा केली. त्यात तुम्ही स्वत:च्या आयुष्यातील अनुभवांबद्दल बोललात, महायोग, शक्तिपात दीक्षा व साधन याविषयी साधकांना मार्गदर्शन केलेत आणि रोजच्या आयुष्यात साधकांनी महायोग कशा रीतीने सम्मिलित करावा हेही सांगितलेत. ई-न्यूजलेटरच्या वाचकांनी या चर्चासत्राचे छानच स्वागत केले. त्यातून त्यांना स्फूर्ति मिळाली व या विषयासंदर्भात त्यांच्या अनेक प्रश्नांकरिता तुमच्याकडून मार्गदर्शन मिळाले. यावेळेस

मी बोलणार आहे तुमच्या महत्वाकांक्षेबद्दल की, महायोगाचा लाभ फक्त एक एकट्या साधकांनाच नाही, तर कुटुंबांना, समाजाला, देशाला व संपूर्ण जगाला त्याचा लाभ व्हावा या आपल्या ध्येयाबद्दल बोलायचे आहे.

गुरूदेव - मला फार बरे वाटले की, आतापर्यंत केलेल्या चर्चेची साधकांना मदत झाली. हा जो विषय तुम्ही सुचविला आहे, की महायोग वैश्विक स्तरावर प्रस्तुत /प्रसारीत व्हावा, ह्याविषयी गेली अनेक वर्षे मी उत्सुक आहे. आणि आता विशेषत: हा विषय समयोचित आहे कारण आपण १ ते ३ मे २०१२ दरम्यान आपण महायोगाचे जागतिक स्तरावरील सम्मेलन आयोजित केले आहे. डॉ विजय भटकर, जे एक महायोगाचे साधक आहेतच पण  एक नामवंत कॉम्प्यूटर शास्त्रज्ञदेखील आहेत आणि सेंटर फॉर डेव्हेलोपमेंट ऑफ अडव्हांसड कॉम्प्युटिंग (सिडॅक)चे संस्थापक व कार्यकारी संचालक आहेत. (संपादक: भारतातील परम मालिकेतील महान क्षमतेच्या कॉम्प्युटरच्या पाठी सिडॅकच आहे.) तेव्हा या महायोगाच्या वैश्विक प्रसारात आपल्याबरोबर अशी सुप्रसिद्ध व्यक्ती आहे, हे आपले भाग्यच आहे. मला आशा आहे की संपूर्ण जगातील साधक ह्या संमेलनास उपस्थित राहतील.

संपादक - मलाही तशीच आशा आहे. पण मला नवल वाटते की असे वैश्विक संमेलन भरविण्याचे तुमच्या मनात प्रथम कशामुळे आले.

गुरूदेव - बरे सांगतो. खूप वर्षापूर्वी जेव्हापासून मी महायोगाचा अभ्यास सुरू केला, ज्ञानेश्वर महाराजांच्या लेखणीने मी फार प्रभावित झालो. महायोगाचे हे शास्त्र सर्वसाधारण मनुष्यासह प्रत्येकापर्यंत आणावे अशी त्यांची इच्छा होती. अर्थात, बराच काळ महायोगाची ओळख फक्त त्यांनाच करून दिली जात असे जे साधक त्यासाठी पात्र

आहेत असे मानले जायचे. पात्र म्हणजे जे सदाचारी आहेत, ज्यांना शास्त्राचे ज्ञान आहे, जे सूज्ञ आहेत, वगैरे. पण मग सर्वसाधारण मनुष्याचे काय? त्यालासुध्दा महायोगाविषयी जाणून घेण्याचा अधिकार नाही का? माझ्या असे लक्षात आले की, मी एखाद्याला पात्र समजतो आहे किंवा नाही, त्याला शास्त्राचे ज्ञान असले वा नसले, तो कोणत्याही धर्माचा किंवा जातीचा असो वा कसाही असो, त्याने काहीही फरक पडत नाही. माझा मूलभूत प्रश्न असा होता की, महायोगाचा प्रयोग प्रत्येकावर होऊ शकतो का, मग तो मनुष्य कोणत्याही, वयाचा, जातीचा, लिंगाचा, धर्माचा, कुळाचा, वंशाचा असो, शिक्षण व समाजातील त्याचे स्थान काहीही असो, इत्यादी. आणि मला असे जाणवले की, महायोग प्रत्येकासाठीच उत्तम कार्य करतो, मग आपल्यामधले वरवरचे फरक काहीही असोत. त्यामुळे आता बरीच वर्षे मी महायोगाची ओळख सर्व जगाला करून द्यायचे कार्य करीत आहे.

संपादक - म्हणूनच तर तुम्ही २००७ साली युनाईटेड किंगडम् व युनाईटेड स्टेट्सचा दौरा केलात.

गुरूदेव - हो, पण माझ्या या प्रयत्नास सुरुवात मी माझ्या अल्पशा पध्दतीने २५-३० वर्षापूर्वी केली होती. मला वाटते की १९८०च्या सुरुवातीस मी जगातील ८० देशांच्या प्रमुखांना मी पत्र पाठवले होते. त्यात महायोगाची थोडीशी माहिती दिली होती आणि त्यांना विनंती केली होती की त्यांनी त्यांच्या नागरिकांपर्यंत ही महिती पोहोचवावी. मागे वळून पहाता हा एक जरासा वेडेपणाच होता. कारण मला एकाही देशाकडून प्रत्युत्तर आले नाही. परंतु काहीही असले तरी प्रयत्न करीत राहणे हे माझे कर्तव्य असे मला वाटते.

संपादक - म्हणजे महायोग वैश्विक स्तरावर नेण्याचा तुमचा प्रयत्न फार वर्षापासून चालला आहे तर.

गुरूदेव - हो, मला ही प्रेरणा होण्याचे कारण असे आहे की, महायोग अत्यंत साधा आहे. अगदी छोट्या मुलाला सुध्दा तो समजू शकतो व अनुभवास येऊ शकतो आणि मोठ्यांनाही तो समजतो. कोणालाही त्याचा सराव करता येतो कारण महायोगाचा आधार प्राणशक्ती आहे, ते वैश्विक चैतन्य आहे जे आपणा सर्वांमध्ये स्थित आहे. श्वासातून जी हवा आपण घेत असतो ती हवाच प्राणशक्तीचे व्यक्त स्वरूप आहे. आपणा सर्वांना हवेची जरूर आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. जी हवा आपण श्वासातून घेतो ती आपणापैकी प्रत्येकासाठी समानच आहे, मग आपण कोठेही राहत असलो तरीही. जसे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, “हे विश्वची माझे घर” किंवा “हे जगच माझे घर आहे”, आणि आपण सर्व एकाच कुटुंबाचे सदस्य आहोत. यावर माझा विश्वास आहे आणि डॉ भटकरांनी या पहिल्या वैश्विक महायोगाच्या संमेलनाकरिता साधकांना पाठविलेल्या आमंत्रणात यावरच विशेष भर दिला आहे.

संपादक - महायोग जागतिक स्तरावर प्रसारीत करण्यामागे तुमचा हेतू काय असावा. हे जग सुंदर बनविणे हाच हेतू आहे ना?

गुरूदेव - खरं तर, एव्हढी मोठी काही माझी आकांक्षा नाही. मला फक्त एव्हढेच वाटते की जर पृथ्वीवरील प्रत्येकजण महायोगाचा सराव करण्यास योग्य आहे व सहजपणे उपलब्ध असलेल्या ह्या महायोगाच्या खजिन्याबद्दल मला त्यांना जाणिव करून द्यायची आहे. मला प्रत्येकाला सांगायचे आहे की महायोगामुळे तुम्हाला शांतता व आनंद मिळू शकतो. सराव करून तर पहा. सराव करावयाचा की नाही हे त्यांच्यावर अवलंबून आहे, मी केवळ त्यांना त्याबद्दल माहिती देऊ शकतो. आणि हेच मी गेली कित्येक वर्षे करतो आहे. आता जगभरात हजारो माणसे आहेत, जे महायोगाचा सराव करतात आणि

त्यांना साधकाच्या अंतरंगी  निर्माण होणाऱ्या एकत्वाच्या भावनेचा, शांततेचा आणि परमानंदाचा अनुभव आला आहे.

जेव्हा जेव्हा मला मन:शांती मिळविण्यात रस असलेली माणसे भेटतात, तेव्हा मी त्यांना महायोगावर मोठे प्रवचन देत नाही. त्याऐवजी मी त्यांना तणावमुक्त आसनात बसावयास सांगतो आणि डोळे बंद करून श्वासाकडे लक्ष देण्यास सांगतो. जेव्हा ते तसे करतात, महायोग आपणच साधला जातो, तो ठरवून साध्य करायचा नसतो. ज्या क्षणी ते डोळे बंद करून बसतात, त्या क्षणी त्यांच्यातील प्राणशक्ती वरवर चढू लागते व त्यांच्या डोक्याच्या वरच्या भागापर्यंत पोहोचते. आपणा सर्वांना व्यापून असलेल्या प्राणशक्तीचा अनुभव येण्यास सुरूवात होते.

दुसरी गोष्ट अशी की, आपण सर्वजण हवेवर अवलंबून असल्यामुळे, जी प्राणशक्तीचे व्यक्त स्वरूप आहे, ती आपल्या मातेसमानच आहे. या संपूर्ण जगात सर्वत्र हवा आहे; हवेला काही देशांच्या सीमा नाहीत, त्यामुळे प्रत्येक देशात वेगवेगळी हवा नसते. आपण तेच रेणू श्वासोच्छ्वासात घेतो व सोडतो, ज्यात या जगातील इतरही श्वासोच्छ्वास करतात. तेव्हा ती प्राणशक्तीच आपल्या सर्वांची माता आहे जी आपणा सर्वांना व्यापून आहे व आपण सर्व एकमेकांचे बंधु व भगिनी आहोत. म्हणूनच महायोगाच्या वैश्विक संमेलनाच्या आमंत्रणात आपण सर्व एकाच कुटुंबाचे सदस्य आहोत यावर भर दिला आहे. आणि म्हणूनच माझी अशी इच्छा आहे की, या पृथ्वीवरील सर्वांना जाणीव होवो की आपण सर्व एकाच मातेची लेकरे आहोत. ती माता चैतन्यशक्तीच आहे जिने आपणा सर्वांना अस्तित्वात आणले आहे.

तेव्हा मी साधकांना सांगतो की, डोळे बंद केल्यावर आपल्या श्वासाकडे लक्ष द्या आणि श्वास जिचे प्रतिक आहे अशा अन्त:स्थ प्राणशक्तीला

शरण जा. यात काही कोणी परक्याला आपण शरण जात नाही आहोत, तर आपल्या स्वत:च्या मातेला शरण जाण्याप्रमाणेच हे आहे. ती माता शक्ती जी आपणा सर्वांना जिवंत ठेवते. या पृथ्वीवरील कोणती व्यक्ती अशी आहे जिला आपल्या मातेला शरण जावेसे वाटणार नाही आणि तिचे मार्गदर्शन नको असेल? आपल्याला माहित असते की आपल्या आईच्या हृदयात आपले भले व्हावे असेच असते. म्हणून आपला तिच्यावर विश्वास असतो आणि तिच्यासाठी काहीही करायला आपण तयार असतो. कदाचित आपल्यासाठी काय उत्तम आहे हे आपल्या लौकिक आईला माहीत नसेल, परंतु आपल्या माता प्राणशक्तीला जास्त चांगल्या प्रकारे माहीत असते. आपल्या अध्यात्मिक उन्नतीसाठी काय हवे आहे ते तिला अचूकपणे ठाऊक असते. म्हणून मी साधकांना सांगत असतो की, जेव्हा ते आपले डोळे बंद करून बसतात तेव्हा त्यांच्या तनामनासहीत सर्वस्वाने माता प्राणशक्तीला शरण जावे. शरीर अतिशय शिथिल ठेवून शरण जावे, तर श्वासाकडे पहाताना माता प्राणशक्तीला श्वास व उच्छ्वासावर नियंत्रण करू द्यावे, म्हणजे सर्व विचार हळूहळू कमी होत जाऊन मन शांत होऊ लागेल. जेव्हा एखादा साधक अशी शरणागतीची वृत्ती ठेवेल तेव्हा साधन आपोआप घडते. साधक ते करीत नाही!

या जगातील सर्व माणसे अशा प्रकारचे साधन करण्यास व अनुभवण्यास सक्षम आहेत. त्याकरिता मला असे वाटते की आपण या जगातील सर्व लोकांना महायोगाची जाणीव करून द्यावी. मला खात्री आहे की पूर्ण जग हे स्वीकारायला तयार होईल. अर्थात ऐहीक जगात लोकांचे एकमेकाविषयीचे गैरसमज चालूच रहातील आणि त्यांची आपसातील भांडणेही चालू रहातील. पण मला वाटते ही अशी भांडणे म्हणजे घरातील लहान मुलांमधील भांडणासारखीच आहेत. एकाच

आईची दोन मुले एकमेकांशी भांडली तरीही आई त्या दोघांवर सारखेच प्रेम करते. त्यांना आईकडून जे प्रेम मिळते त्यामुळे कालांतराने त्यांना उमजून येते की, आपली आपसातील भांडणे निरर्थक आहेत. आपण गुण्यागोविंदाने शांतपणे एकमेकांसोबत रहाणेच इष्ट आहे.

संपादक - हे खरेच आहे. जर प्रत्येकाला जाणिव झाली की, ती सर्व एकाच उर्जामातेची, प्राणशक्तीची लेकरे आहेत, तर हे जग फार सुंदर बनेल. परंतु यासाठी आपण वेगवेगळ्या देशातील लोकांना, विशेषत: ज्या देशांमध्ये आपसात युध्द चालू आहे त्यातील लोकांना या महत्वपूर्ण सत्याची जाणिव कशी करून देणार आहोत?

गुरूदेव - हो, आपण लोकांना विचारू या की ते हवेशिवाय जिवंत राहू शकतात का? विश्वचैतन्याचे हवा हे पार्थिव रूप आहे आणि तिच्यामुळेच आपण जिवंत रहातो. मी हवेशिवाय जगू शकतो असा दावा कोण करू शकेल? सर्वांसाठी सामायिक असलेल्या हवेचा वापर न करता ते एक शब्द तरी उच्चारू शकतील का? एव्हढे पुरे आहे!

संपादक - परंतु वेगवेगळ्या राष्ट्रीयत्वाची व धर्माची अनेक माणसे महायोगाबद्दल त्याच्या परिणामांबद्दल वा विश्वबंधुत्वाबद्दल मोकळ्या मनाने काही ऐकण्यास तयार नसतात. अशा परिस्थितीत आम्ही काय करावे?

गुरूदेव - महायोगाचा तसा धर्माशी काहीही संबंध नाही. कोणी लहानपणापासून कोणत्याही धर्माची शिकवण घेत असला किंवा कोणत्याही धर्माचे पालन करीत असला तरी प्रत्येकजण महायोगाची साधना करू शकतो. साधन करण्यासाठी धर्मश्रद्धा बदलण्याची काहीच गरज नाही.

अर्थात जर एखाद्याला महायोगाविषयी माहिती ऐकण्यात काही स्वारस्यच नसेल, तर त्यासाठी आपण काहीच करू शकत नाही. लोकांनी आपले म्हणणे ऐकावे अशी जबरदस्ती करता येणार नाही. आपण काय करू शकतो तर, ज्या लोकांना आध्यात्मिक प्रगतीत स्वारस्य आहे व ज्यांनी आपल्या मनाचे दरवाजे बंद करून घेतलेले नाहीत, त्यांना याची जाणिव करून द्यायची आहे की असा एक सोपा व सहजसाध्य मार्ग आहे, जो सर्वांसाठी उपलब्ध आहे.

जर ते आपणहून थोडा वेळ शांत बसण्यास तयार झाले, समजा निदान दहा मिनिटे व मी आधीच आखून दिलेल्या सूचना त्यांनी अनुसरल्या तर महायोगाच्या साधनेचा अनुभव त्यांना खरोखरच लाभेल. मग त्यांचे राष्ट्रीयत्व व धर्म कोणताही असो. त्याने काही फरक पडत नाही. ते याचा अनुभव घेऊ शकतील. त्यांना दुसरे काहीच करायचे नाही. केवळ शांतपणे बसायचे, डोळे मिटायचे, श्वासाचे निरीक्षण करायचे, शक्तीमातेला शरण जायचे आणि जे घडते आहे त्याकडे फक्त पहात रहायचे.एकदा त्यांना महायोगाच्या मार्गाची ओळख झाली व अनुभव आला की त्याचा रोज सराव करायचा की दुर्लक्ष करायचे हे सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून आहे. आपण फक्त त्यांना माहीत करून देण्याचा प्रयत्न करायचा आहे की असा एक विस्मयकारक मार्ग उपलब्ध आहे व आपण सगळेच त्या मार्गावरचे अनुभव घेण्यास सक्षम आहोत.

(संपादकाची नोंद:- यावेळेस प.पू. प्रभुणे महाराजसुध्दा या चर्चेत सामील झाले.)

संपादक - प्रभुणे महाराज आपले या चर्चासत्रात स्वागत आहे. आम्ही आता याबद्दल बोलत होतो की, जगाला महायोग मार्गाची ओळख करून देणे किती महत्वाचे आहे. पण काही वेळा आमच्यासमोर अशी

माणसे येतात की ज्यांनी आपली मने बंद करून घेतली आहेत आणि आम्हाला जे सांगायचे आहे ते ऐकण्यासही ते तयार नाहीत. अशा परिस्थितीत काय करावे, याविषयी आम्ही बोलत होतो.

गुरूदेव - मी आधीच म्हटले, की लोक जर आपले म्हणणे ऐकायलाच तयार नसतील तर आपण काहीच करू शकत नाही. ही महायोगाची अमूल्य देणगी आपण प्रत्येकापर्यंत पोहोचवायला हवी, पण ज्यांना ती स्वीकारायची नाही, त्यांना तिथेच सोडून द्यायला हवे. यासाठी थोडा वेळ लागेल. जेव्हा काही लोक महायोग खरोखरच अंगीकारण्यास वा अनुसरण्यास तयार होतील, तेव्हा हळूहळू साधकांच्या प्रत्यक्ष अनुभवांबद्दल सर्वांना माहीत होईल आणि जे महायोग मार्गावर येण्यास अनुत्सुक आहेत, तेही ऐकण्यास तयार होतील. कदाचित प्रयत्न करण्यासही तयार होतील.

प्रभुणे महाराज - आपले संपादक जे म्हणतात ते सत्य आहे. काही दिवसांपूर्वी मी नाशिक येथील इंजिनिअरींग कॉलेजमध्ये महायोगावर व्याख्यान देण्यास गेलो होतो. तिथे मला एक प्रोफेसर भेटले. मी इंजिनियर आहे हे ऐकून ते माझे भाषण ऐकण्यास आले होते. माझे भाषण संपल्यानंतर ते माझ्याकडे आले व म्हणाले, ‘सॉफ्टवेअरचे डिझाईन आणि त्यामागचे गणित विद्यार्थ्यांना शिकवणे हीच त्यांची साधना आहे आणि त्यांना इतर कोणत्याही पध्दतीची साधना करण्याची गरज नाही.’ त्यांच्या या परिस्थितीबाबत मला काय वाटते असे त्यांनी विचारले. मी त्यांना सांगितले की, ज्या गोष्टीत त्यांना आनंद मिळतो त्या गोष्टी त्यांनी करत रहाव्यात आणि महायोग साधनेला बसण्याने वेळ फुकट जातो असे त्यांना वाटत असेल तर त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. जगात असे अनेक लोक आहेत, ज्यांना आपली मने बंदिस्तच ठेवायची आहेत आणि त्यासाठी आपण

काहीच करू शकत नाही. आपण बंदिस्त मनांना उघडण्याची जबरदस्ती करू शकत नाही. एखाद्याने मनाने स्वीकारले नाही तर महायोगाचे साधन साधणारच नाही.

गुरूदेव - हे बरोबर आहे. आपण फक्त इतकेच करू शकतो की, जे ऐकण्यास इच्छुक आहेत त्यांना सांगायचे की आंतरिक शांती व आनंदासाठी परिणामकारक असा एक मार्ग आहे तोही बिनपैशाचा! आता प्रयत्न करणे व प्रत्यक्ष अनुभव घेणे हे सर्वस्वी त्यांच्यावर अबलंबून आहे. या आंतरिक अनुभवाशिवाय केवळ बौध्दिकरित्या हा मार्ग समजणे अशक्य आहे.

संपादक - यामुळे मला त्यासंदर्भातील एक गोष्ट/मुद्दा आठवला. महायोगाचा प्रसार करणे इतके महत्वाचे का आहे? जर काही लोक त्याविषयी ऐकायला तयार नाहीत आणि काही जे ऐकतात ते प्रयत्न करण्यास अनुत्सुक आहेत, तर हा प्रसाराचा घोळ आपण घालायचाच का? प्रसाराचा एव्हढा त्रास घ्यायचाच का?

गुरूदेव - कारण जितक्या लोकांना समजवता येईल तितक्यांना सांगायचे आहे की, आपण सर्व एक आहोत. हाच अद्वैत सिध्दांताचा पाया आहे. आमची अशी इच्छा आहे की जमेल तितक्या जास्तीत जास्त लोकांनी याचा अनुभव घ्यावा. महायोग हा अद्वैत / एकपणा अनुभवण्याचा सोपा मार्ग आहे. परंतु जे शिकवितात की या पृथ्वीवरील आपण सर्व एक आहोत त्या सर्व धर्मांचा किंवा संप्रदायांचाही आम्ही स्वीकार करतो/ आदर करतो.

संपादक - प्रसारासाठी हे कारण निश्चितपणे सर्वोत्तम आहे. या पृथ्वीवरील सर्वांना विश्वबन्धुत्वाचा अनुभव घेण्यास प्रवृत्त करणे, हेच ध्येय आहे. पण तरीही आपल्या महायोग परंपरेत (अगदी अलीकडच्या काळात मागे पहाता १९व्या शतकातील प.पू. गंगाधर तीर्थ

महाराजांपर्यंत) एकनिष्ठ असे काही दिग्गज होते, ज्यांनी प्रसारावर असा काही भर दिलेला नाही. त्यांचा दृष्टीकोन असा होता की, प्रत्येकाला महायोग समजावत बसण्याला व अनुभव घेण्यास सांगण्याला काही अर्थ नाही. जो महायोग साधन करण्यास योग्य आहे, त्याला तो सापडेलच आणि त्याला दीक्षा मिळणे असल्यास योग्य असे सिध्दगुरू भेटतीलच. खूप मोठ्या प्रमाणात साधकांची संख्या वाढवण्यात त्यांना काही स्वारस्य नव्हते. जे त्यांच्याकडे येतील त्यांना दीक्षा द्यायची, एव्हढ्यावरच ते संतुष्ट होते.

प्रभुणे महाराज - हो बरोबर आहे. काही जणांची अशी प्रवृत्ती होती की, 'हमे दल नही बढाना है'.

गुरूदेव - हो, काही प्रमाणात हे सत्य आहे. प.पू. स्वामी गंगाधर तीर्थ महाराज यांचे एकमेव शिष्य होते प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराज. इतरही काही जण असे होऊन गेले ज्यांनी प्रसाराचे काही प्रयत्न केले नाहीत.

प्रभुणे महाराज - परंतु प.पू. स्वामी गंगाधर तीर्थ महाराजांनी त्याच्या एकमेव शिष्याला, प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराज यांना महायोगाची ही अमोल देणगी दिली आणि त्यांची अशी अपेक्षा होती की महायोगाचा प्रसार जगभर व्हावा. त्यामुळे जरी प.पू. स्वामी गंगाधर तीर्थ देव महाराजांनी स्वत: प्रसार केला नाही तरी त्यांचे शिष्य प.पू.स्वामी गंगाधर तीर्थ देव महाराजांतर्फे त्यांनी महायोगाचा प्रसार केला.

गुरूदेव - पुढे माझे गुरू प.पू. लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज यांना त्यांचे गुरू प.पू. स्वामी शंकर पुरुषोत्तम तीर्थ महाराज यांनी आदेश दिला होता की, उत्तर भारतातील काशी येथून निघावे व दक्षिण भारतात जावे. त्यांना असा आदेश का दिला गेला? तर भारतातील त्या

प्रदेशात त्यांनी महायोगाचा प्रचार करावा. ते दक्षिण भारतात आले तेव्हा ते श्री वामन गुळवणी यांना भेटले, जे पुढे त्यांचे एक शिष्य बनले आणि आपण त्यांना प.पू. गुळवणी महाराज म्हणून ओळखतो. तुम्हाला माहीत आहेच की संपूर्ण दक्षिण-पश्चिमेकडील (नैऋत्येकडील) भागात व त्यापुढील प्रदेशातही महायोगाच्या प्रचारासाठी प.पू. गुळवणी महाराजच कारणीभूत ठरले आहेत.

संपादक - अशी शक्यता आहे की आपल्या परंपरेत सर्वच सिध्दगुरूंचा हा हेतू होता की प्रसार व्हावा. पण काही जणांनी प्रसाराला इतरांपेक्षा अधिक प्राधान्य दिले. याच संदर्भांतर्गत काही दिग्गजांनी त्यांना जे साधक सुयोग्य वाटले अशांनाच शक्तिपात दीक्षा दिली. (महायोग दीक्षा हे गुरुकडून शिष्याकडे शक्तीसंक्रमण असते.) परंतु काही गुरुजनांनी ज्यांनी दीक्षेसाठी विनंती केली, त्या सर्वांनाच दीक्षा दिली आहे. तरीही या पृथ्वीवरील सर्वांना महायोगाविषयी अवगत करताना काही अपात्र माणसांनाही दीक्षा दिली जाईल. ही गोष्ट चिंताजनक नाही का?

गुरूदेव - आमचे उत्तर असे आहे की, जे सर्व स्वत:बद्दल विचार करू शकण्याइतके प्रौढ आहेत, ते शक्तिपात दीक्षा घेण्यास लायक आहेत. जेव्हा साधक दीक्षा मिळण्यासाठी विनंती करतो आणि त्यासाठी असलेल्या अटी मान्य करतो, तेव्हापासूनच दीक्षेची प्रक्रिया सुरू होते. त्यानंतर जे घडेल ते परमेश्वराच्या म्हणजे चैतन्यशक्तीच्या हातात असते. मी फक्त साधकाला सांगतो की त्याने दीक्षेसाठी बसावे आणि मग दीक्षा होते वा नाही, कोणत्या प्रकारच्या क्रिया होतात (आपोआप होणारया शारीरिक वा मानसिक क्रिया) ते सर्वस्वी ईश्वरी शक्तीच्या हाती आहे. एखादा साधक दिक्षेस पात्र आहे व दुसरा अपात्र आहे असे ठरविणारा मी कोण आहे? जे आहे ते साधक व ईश्वरी शक्ती याच्यातील आहे. आम्ही साधकांना दीक्षा घ्या असे मुळीच सांगत

नाही. आम्हाला केवळ प्रत्येकाला महायोग काय आहे याविषयी माहिती द्यायची आहे. धर्म, सामाजिक वर्गवारी, संप्रदाय, लिंग, सामाजिक स्तर, जात, इत्यादी वरवरचे फरक आपल्याला वेगवेगळे करीत असले तरी, हा महायोग सर्वांसाठीच उपलब्ध आहे. प्रत्येक व्यक्तीने या माहितीचे काय हवे ते करावे. शिष्यगणांची संख्या वाढवण्यात आम्हालाही स्वारस्य नाही. आम्ही फक्त संदेशवाहक आहोत. ती ईश्वरी शक्तीच कर्ती करवती आहे.

प्रभुणे महाराज - आमचे प्रचाराचे तत्व अगदी साधे आहे. आम्हाला वाटते काहीतरी उत्तम असे सापडले आहे, असे काही ज्यामुळे व्यावसायिक लोकांना मानसिक शांततेचा व निर्भेळ आनंदाचा लाभ होतो. साधकाला महायोगाचे आचरण करताना कोणत्याही बाहेरील वस्तूची गरज नसते. त्यासाठी काहीही खर्च येत नाही आणि कोणालाही स्वत:चा धर्म, काम किंवा धंदा, कुटुंब, इत्यादी सोडून देण्याची आवश्यकता नाही. आम्हाला फक्त इतकेच करायचे आहे की, विचारणा केल्यानंतर ही महायोगाची देणगी सर्वांसाठी उपलब्ध आहे, असे प्रत्येकाला सांगायचे आहे.

संपादक - आणि ही माहिती इतरांना देताना आपण अहंकारात अडकू नये व साधकांची संख्या वाढण्याची मनीषा न बाळगणे हेही महत्वाचे आहे. प्रसार करीत असताना याचे भान ठेवणे फार महत्वाचे आहे.

प्रभुणे महाराज - हे अगदी बरोबर आहे. प्रसार करीत असता एखाद्याने स्वत:चा अहंकार जोपासण्यासाठी व शिष्यगण वाढवण्यासाठी त्यात गुंतू नये. हे तर महायोगाच्या सिध्दांतांच्या अगदी विरुध्द आहे.

तरी पण एक गोष्ट अशी गंमतीदार आहे की गेल्या काही वर्षात माताशक्ती अधिकच सक्रीय झाली आहे आणि असे दिसते, तिची इच्छा आहे की ज्यांची प्राणशक्ती जागृत व्हावी अशा साधकांची संख्या

वाढावी. महायोगाचे एक दिग्गज प.पू. स्वामी शिवओम तीर्थ महाराज (संपादक - जे आत्ताच काही वर्षापूर्वी स्वर्गवासी झाले.) जे शक्तिपात गुरू असण्याचा काळात फक्त निवडक लोकांनाच दीक्षा देत असत. मात्र शेवटच्या दिवसात बिछान्याला खिळले असताना आपल्या शिष्यांना त्यांनी अशी विनंती केली की महायोगाची देणगी उदारपणे सर्व साधकांपर्यंत पोहोचवावी.

गुरूदेव – जणुकाही एखाद्याने माझ्याकडे पेढ्याचे अनेक डबे आणून दिले आणि मला ते इतरांसोबत वाटून खायचे आहेत. तर यात काही चुकीचे आहे का? मला नाही तसे वाटत.

प्रभुणे महाराज – आणखी एका गोष्टीवर मला भर द्यावासा वाटतो. आम्ही कोणालाही दीक्षा घेण्याचा आग्रह करीत नाही किंवा सूचना देत नाही की त्यांनी दीक्षा घ्यावी. मी जेव्हा महायोगावर भाषण देतो तेव्हा मी कधीच दीक्षेसंदर्भात बोलत नाही. मी फक्त महायोग काय आहे याविषयी माहिती देतो आणि लोकांना सांगतो की, त्यांनी महायोगाचा पूर्वाभ्यास करण्यास बसावे. जेव्हा ते पूर्वाभ्यास करण्यास बसतात. तेव्हा त्यांना शांततेचा अनुभव येतो. कित्येक वेळा भाषणानंतर ते माझ्याभोवती गोळा होतात आणि विचारतात की पुर्वाभ्यासापुढे महायोगात काय आहे? फक्त तेव्हाच मी त्यांना दिक्षेविषयी माहिती देतो. पण तेव्हाही मी ते अशा प्रकारची दीक्षा घेऊ शकतात एवढेच सांगतो. मी त्यांनी दीक्षा घ्यावी असे कधीच सूचित करीत नाही किंवा त्यांना दीक्षा घेण्याचा आग्रह करीत नाही.

गुरूदेव – वस्तुत: काही लोक जेव्हा पूर्वाभ्यास करण्यास बसतात तेव्हाच त्यांची प्राणशक्ती जागृत झाल्याची चिन्हे दिसतात! पूर्वाभ्यास म्हणजे औपचारिक दीक्षा नव्हे. परंतु कित्येक वेळा साधक पुर्वाभ्यासास बसले असतानाही प्राणशक्ती आपोआपच जागृत होते. यात माझा तसा काही संबंध नाही. हा पूर्णपणे साधक व प्राणशक्ती यांच्यामधील संबंध आहे.

अशी पण काही उदाहरणे आहेत जेव्हा दीक्षा आपोआप घडते. जसे आमच्या इथे एक रखवालदार होता. त्याने दीक्षेसाठी विनंती केली व एक दिवस त्याला दीक्षा मिळाली. त्यानंतर तो जेव्हा घरी गेला तेव्हा त्याच्या हातातील कागदावर गुरुदेवांबाद्द्ल पूज्यबुद्दीने व आदराने लिहिले होते, 'श्री श्री गुरवे नमः|' त्याच्या बायकोने गुरुदेवांना नमन केलेले वाक्य फक्त वाचले आणि तिला ताबडतोब क्रिया होऊ लागल्या व दीक्षा घडली. या सर्व बाबतीत माझा काही हात नव्हता. हा तिच्यातील व प्राणशक्तीतील संबंध होता. तिच्या अंतरीची प्राणशक्ती आपोआप जागृत झाली आणि दीक्षा घडली. ईश्वरी शक्ती किंवा दैवी सत्तेचाच तो अधिकार आहे, जी ठरविते की कोणाला दीक्षा मिळेल वा कोणाला नाही. महायोग दीक्षा ही खरोखर ईश्वरी दीक्षा आहे. ही परमात्म्याची दीक्षा आहे, माझी नाही. प.पू. लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज नेहमी म्हणायचे, ही 'भगवती दीक्षा' आहे. प.पू. गुळवणी महाराज हीस 'देवाची दीक्षा' म्हणत असत. मला कल्पना नाही की दीक्षा घडण्यास काय कारण असते. मला फक्त माहीत आहे की दीक्षा होते, ती घडते, ती घडवून आणली जात नाही. मला अशी आशा आहे की कधीतरी अशी वेळ येईल, जेव्हा या पृथ्वीवरील प्रत्येकजण हा अनुभव घेऊ शकेल.

संपादक – या आधीच्या आपल्या चर्चेत आपण स्वतःच्या भूमिकेबद्दल म्हणाला होतात की, 'मी एक पोस्टमन आहे. साधकासाठी पाठविण्यात आलेले टपाल मी त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे साधे कार्य करतो.'

गुरूदेव – अगदी बरोबर! मी स्वतःला पोष्टमनच समजतो किंवा एखादा घरोघरी वर्तमानपत्र टाकणारा असतो तसा. मला वाटते की ज्याच्यासाठी ते वर्तमानपत्र पोहोचवले जाते तो ते वाचत असेलच, परंतु दुसऱ्या कोणीसुद्धा जर ते वाचले व त्यातून त्याला काही लाभ झाला, तर ते उत्तमच आहे! एकदा वर्तमानपत्र दिले की ते कोण वाचेल याची मला काहीच कल्पना नसते. तो वाचणारा व वर्तमानपत्र यांच्यातीलच संबंध आहे.

प्रभुणे महाराज – जर प.पू. काकामहाराजांची हरकत नसेल तर मला पुन्हा मागे जाऊन यापूर्वी आपण उपस्थित केलेल्या गोष्टीविषयी चर्चा करायची आहे. एखाद्या साधकाला दीक्षा देण्याआधी त्याची पात्रता जोखावी की नाही. संत तुकाराम महाराज म्हणाले आहेत, 'लोह परिसाची न साहे उपमा, सद्गुरु महिमा अगाधची'. याचा अर्थ असा की गुरूच्या सान्निध्यात असताना गुरू व साधकात जे काही घडते, त्यासाठी परीसस्पर्शाने सोने बनलेल्या लोखंडाची उपमा फारच तोकडी आहे. परीसाच्या तुलनेत खऱ्या गुरूचा महिमा अगाध आहे.

परीसाच्या बाबतीत एक गोष्ट आहे की तो लोखंडाचे सोन्यात रुपांतर करतो. परंतु लोखंडाऐवजी तो धातू तांबे असला तर? सद्गुरु फक्त लोखंडाचेच सोने बनवित नाहीत तर तांब्याचेही सोन्यात रुपांतर करतात. काही गुरू असे आहेत की, जे लोखंडाचे सोने बनविण्याआधी तांब्याचे लोखंड होईपर्यंत थांबतात. परंतु काकामहाराजांचा दृष्टीकोन (ॲप्रोच) असा आहे की 'थांबायचे का?' ते तांबे असो व इतर काही असो, दीक्षा होण्यास माझी संमती असते. नियमित साधन (महायोग ध्यान) केल्याने कोणाचेही लोखंड बनू शकते आणि या स्थित्यंतरानंतर साधकाचे लगेचच सोन्यात रुपांतर होऊ शकते. त्यांचे म्हणणे असे की, 'दिक्षेस कोणी पात्र आहे किंवा नाही हे ठरविणारा मी कोण आहे. जर कोणी माझ्याकडे आला आणि त्याने दीक्षेसाठी मनापासून विनंती केली तर मी त्याला दीक्षा देईन. पुढे नियमित साधन केले तर योग्य वेळ येताच त्याला आत्मज्ञानाची प्राप्ती होईल.'

गुरूदेव – म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, 'या रे या रे सारे जन'. ते असे म्हणाले नाहीत, 'फक्त तुम्हीच या इतरजण नको'. त्यांनी सर्व जगाला स्वत:बरोबर येण्याचे आमंत्रण दिले आहे. सर्व जगच 'देवस्वरूप' आहे, कारण प्रत्येकात प्राणशक्ती वास करते आहे.

संपादक – आपण पुन्हा एकदा प्रसाराच्या मुद्याकडे वळूया. प्रभुणे महाराज याआधी म्हणाले होते तसे, आम्ही सर्वांनी प्रसार करावा, परंतु प्रसारात अहंकाराचा भाग नसावा. पण स्वतःचा अहंकार बाजूस ठेवून प्रसार करणे बहुतेक वेळा साधकाला अवघड जाते. उदाहरणार्थ, एखादा साधक महायोगाविषयी थोडे काही भाषण देत असेल आणि मग त्याने श्रोत्यांना साधनेच्या पूर्वाभ्यास करण्यास बसावयास सांगितले तेव्हा श्रोत्यांपैकी काही जणांना आपोआपच क्रियांचा अनुभव येऊ लागला.

हे झाल्यास त्या साधकाला असे वाटू शकते की, ‘अरे वा! माझ्यामुळेच या सर्व लोकांना महायोगाचा प्रत्यक्ष अनुभव येतो आहे.’ किंवा त्या साधकाला इतर लोक प्रश्न विचारू लागतात आणि तो त्यांना उत्तरे देऊ लागतो. त्यामुळे इतरांना त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीस मदत होऊ शकते व ते साधकाच्या सल्ल्याबद्दल त्याचे आभार मानतात. या सर्वामुळे त्या साधकाला वाटू शकते, ‘अरे वा! मी या सर्वांच्या आध्यात्मिक प्रवासास किती मदत करतो आहे.’ हा ‘मी’पणा आणि ‘अहं’ प्रसारकार्य करणाऱ्या साधकांच्या मनात नेहमीच तयार होतो. माझ्या स्वतःच्या अनुभवांवरून मी सांगतो की हे घडते. आमच्यासारख्या प्रचारकार्य करणाऱ्या साधकांना आमच्या ‘अहं’चा गुंता सुटावा म्हणून किंवा आमचा ‘अहं’ कमी व्हावा म्हणून काय करावे असा आपण सल्ला द्याल?

गुरूदेव – तुम्ही जे म्हणता ते सत्य आहे, परंतु त्यासाठी असा काही सोपा उपाय नाही. अशा परिस्थितीत काय घडते त्याबद्दल आपण दोन पध्दतीने विचार करू शकतो. एक असा आहे, ‘मी हे करतो आहे’ आणि दुसरा असा की, ‘ही जागृत झालेली माताशक्ती कार्य करीत आहे’. जर साधकाला वाटत असेल की, ‘मी करतो आहे’ तर प्रसारकार्य केल्याने त्याचा अहंकार जोपासला जाईल यात शंकाच नाही. परंतु साधकाने असा दृष्टीकोन ठेवला की, माताशक्ती काम करते आहे, त्याचे स्वतःचे काम व श्रोत्यांना अनुभवास

येणाऱ्या साधनेतील क्रिया हे शक्तीचे कार्य आहे, त्याचे स्वत:चे नाही, तर त्याचा अहंकार वाढणार नाही. जर साधकाने हे समजून घेतले की, प्रसारकार्य हे एका प्रकारे साधनच आहे, शक्तीमातेमुळे ते घडत असते आणि त्यात तो स्वत: काही करीत नाही, तर त्याच्या आध्यात्मिक प्रगतीवर नकारात्मक परिणाम होणार नाही, उलट त्यास गतीच मिळेल.

परंतु तुमचेही बरोबर आहे. साधकाला हे समजून घेणे कठीण आहे की तो साधनेस बसतो तेव्हाच फक्त क्रिया होतात असे नाही तर साधनेव्यतिरिक्तच्या कामातही त्या होत असतात. तुमची वृत्ती जर योग्य/ सकारात्मक ठेवलीत तर आणि प्राणशक्तीला तिचे कार्य करू दिले तर तुमची सर्व कामे साधनेतील क्रीयांसारखीच होतील. आपला 'अहं' सोडून देणे फार कठीण असते. पण आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की परमात्म्याची शक्तीच हे सर्व घडवून आणत असते. आपण केवळ त्याच्या हातातील अवजारे आहोत. ती शक्तीच आहे जी काम करीत असते, तुम्ही नाही, त्रिवार नाही.

प्रभुणे महाराज – आणखी एक गोष्टसुध्दा आपण लक्षात ठेवली पाहिजे की ही आपली शक्ती नव्हे. ती आपल्याकडे हजारो वर्षापासून हस्तानुहस्ते परंपरागत महायोगाच्या गुरूंकडून आली आहे. ती कोणा एका व्यक्तीची शक्ती नाही. ती तर परम शिवाकडून उद्‌गम पावली आहे. तीच कर्ती आहे, दुसरी कोणी व्यक्ती नाही. अगदी कोणी महायोगाचा महारथी असो, सिध्द गुरू असो वा महायोग परंपरेतील कोणीही असो, हे कोणीही करीत नाहीत, ती शक्तीच कर्ती आहे.

संपादक – प्रसार हेच साधन कसे असते यावर प्रकाश टाकल्याबद्‌दल मी तुम्हा दोघांचेही आभार मानतो. सर्व साधकांना हे स्पष्टपणे कळले पाहिजे की फक्त साधनेस बसलो असतानाच प्राणशक्तीस शरण जायचे नाही परंतु

आपल्या दैनंदिन कामात व प्रसार करतानाही शरणागत राहिले पाहिजे. जागृत झालेली शक्तीच कार्य करीत असते, केवळ साधन करतानाच नाही तर इतर वेळेसही ती कार्य करते. हे समजून जेव्हा साधकाच्या संवेदना विकसित होतील तेव्हा त्याचा अहंकार कमी होत जाईल व आत्मज्ञानाप्रत त्याची प्रगती होऊ लागेल.

मला आता वेगळ्याच मुद्द्यावर आपले विचार जाणून घ्यायचे आहेत. काळाबरोबर महायोग कशाप्रकारे विकसित झाला आहे आणि पुढे कशा प्रकारे विकास पावू शकेल. आपल्याला सर्वांना माहीत आहेच की पूर्वीची अनेक शतके भारतावरील राज्यकर्ते विरुध्द मताचे असल्यामुळे महायोग जनसामान्यांपासून लपविला गेला होता. काही निवडक लोकच महायोगाचा सराव करीत असत आणि सिध्दगुरूकडून ही विद्या शिष्यांकडे संक्रमित होत असे. तेही अगदी मोजकेच शिष्य असत. १९व्या शतकाच्या मध्यावर प.पू. स्वामी गंगाधर तीर्थ महाराजांमुळे जेव्हा महायोगाची माहिती बाहेर येऊ लागली, तेव्हा त्यांनी त्यांचे शिष्य प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराज यांना सांगितले की, ‘अधिकाधिक साधकांना महायोग उपलब्ध करून देण्यात यावा.’ जसजशी वर्षे गेली तसा महायोगाचा विकास झाला व ते ज्ञान संन्यासीपर्यंत मर्यादित न राहता गृहस्थांसाठीही उपलब्ध झाले. पुढे प.पू. गुळवणी महाराजांनी ‘संकल्प दीक्षे’ची प्रथा सुरू केली. केवळ विचारांच्या निर्धाराने दीक्षा देण्यात आल्याने हजारो लोक जे पत्राद्वारे दीक्षेसाठी वारंवार विनंती करीत होते त्यांनाही लाभ झाला. अशाप्रकारे अधिकाधिक लोकांना महायोग उपलब्ध झाला. यात अधिक भर म्हणून गुरूदेवांनी (प.पू.काकामहाराजांनी) आता पुढाकार घेतला आहे की इंटरनेटवरून विनंती अर्ज पाठवणाऱ्यांनाही दीक्षेचा लाभ मिळावा. तसेच महायोगाचा पूर्वाभ्यास सर्व साधकांना करता यावा, तसेच त्यासाठी दीक्षेबरोबर पाळावे लागणारे निर्बंध पाळण्याची आवश्यकता नाही, या

प्रकारच्या गुरूदेवांच्या धोरणामुळे महायोगाचा विस्तृतपणे सर्वत्र प्रसार झाला व प्रत्येकास त्याचा लाभ होऊ शकतो.

गुरुदेव – ज्याप्रकारे महायोग प्रसारीत होतो आहे, त्यानुसार तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु हे सर्व बदल प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराज वा प.पू. गुळवणी महाराज वा मी स्वत: यांनी घडवून आणलेले नाहीत. हा बदल झाला आहे  कारण परमात्म्याच्या मनात ते घडावे असे होते. ही सुधारणा व्हावी म्हणून आम्ही फक्त वाहकाचे कार्य करतो.

संपादक – याआधी ज्या गोष्टीविषयी आपण चर्चा करीत होतो त्यासाठी हे उत्तम उदाहरण आहे. हाच दृष्टीकोन बाळगावा की आपण कार्य करीत नसून ती पराशक्ती खरोखरची कर्ती आहे.

असे असले तरी आपण सर्वजण सहमत आहोत की काळाबरोबर महायोग अधिकाधिक विकसित झाला आहे. आता पुढील स्थित्यंतरात महायोग वैश्विक स्तरावर नेण्यासाठी, त्या परमात्म्याच्या हातातील हत्यारे म्हणून काम करीत असताना आपल्याला आधुनिक काळानुसार उदभवणाऱ्या साधकांच्या अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते आहे. हे केवळ अमेरिका व युरोपसारख्या पाश्चिमात्य देशातच नाही तर भारतातील अनेक छोट्या मोठ्या शहरात, मध्यपूर्वेकडील देशात, तसेच सर्वत्र होते आहे. साधकांचे हे प्रश्न बहुधा  दीक्षा घेताना जे निर्बंध पाळण्याच्या अटी आपण घालतो त्या संदर्भात असतात.

गुरूदेव – हो, मला त्याची जाणिव आहे. तसे पाहता या निर्बंधांना स्वत:चे असे काही अंगभूत मूल्य नाही. ते थोडे शिथिल करता येतील. सर्वात महत्वाची गोष्ट आहे ती महायोगाच्या सरावाने परमात्म्याशी संपर्क झाल्याचा अनुभव घेणे. महायोगाच्या मार्गावर चालणे साधकांना सोपे व्हावे यासाठी ते निर्बंध आहेत. बस एवढेच.

प्रभुणे महाराज – एका दृष्टीने महायोगाच्या पूर्वाभ्यासाचा लाभ सर्वांना मिळावा म्हणून आपण आधीच ही बंधने शिथिल केलेली आहेत. पूर्वाभ्यासाच्या सरावासाठी साधकाला कुठचेही निर्बंध पाळण्याची आवश्यकता नाही. तरीही त्याला महायोगातील अनुभवांचा आशीर्वादात्मक लाभ होऊ शकतो. ही एका अर्थी ‘छुपी दीक्षा’च आहे असे आपण म्हणू शकतो.

संपादक – हे सत्य आहे. परंतु आपण सतत साधकांच्या तक्रारी ऐकतो की, ते दीक्षा घेण्यास तयार आहेत पण हे निर्बंध पाळीन असे कबूल करणे त्यांना शक्य नाही. तसेच दीक्षित साधकांकडून अनेक वेळा विचारणा होते की, आम्हाला ही बंधने पाळण्याची इच्छा आहे, पण ज्या परिस्थितीत ते रहात आहेत त्यात संपूर्ण निष्ठेने ते पाळता येत नाहीत. त्यामुळे त्यांना आपण अपराधी असल्यासारखे वाटते.

प्रभुणे महाराज – हो, आम्ही अशा अनेक उदाहरणांविषयी ऐकले आहे. काही साधकांना निर्बंध पाळणे अशक्य असते. प.पू.काकामहाराजांचा असा सल्ला आहे की साधकांनी शक्य असतील तितके निर्बंध पाळावेत, परंतु शक्य होत नसेल तरी ठीक आहे. त्याकरिता अपराधी वाटून घेण्याचे काही कारण नाही. साधकाने आपल्या इच्छेनुसार नियम पाळावेत, केवळ ते अत्यावश्यक आहेत म्हणून नाही.

गुरूदेव – हो, जर साधकाने ही बंधने पाळली तर त्याची प्रगती वेगाने होईल. परंतु पाळता आले नाहीत म्हणून त्यातच अडकून पडू नये व त्याबद्दल अपराधी वाटून घेण्यात काही अर्थ नाही. ज्यांना हे पाळणे शक्य आहे त्यांनी ते जरूर पाळावेत. त्यातून त्यांना लाभच होईल. महायोग अनुसरताना हे निर्बंध अत्यावश्यक आहेतच असे नाही. पण ते स्वच्छेने पाळल्यास साधकाची ह्या मार्गावरील प्रगती बरी होईल.

संपादक – ही खरोखर महत्वपूर्ण संकल्पना आहे. मला वाटते, याचा अर्थ असा की जर जास्त लोकांना महायोगाची ओळख झाली, मग त्यांच्यात निर्बंध पाळण्याची क्षमता असो वा नसो, तर त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीकरिता ते उत्तमच ठरेल. तेव्हा निर्बंध पाळणाऱ्यानाच या अदभूत मार्गाची ओळख किती जणांना करून द्यायची अशी मर्यादा कशाला घालावी? कारण आधुनिक काळात बऱ्याच लोकांना निर्बंध पाळणे अशक्य आहे किंवा फार कठीण होते. साधक जसजसा या मार्गावर पुढे जाऊ लागेल तसतसा त्याला निर्बंध पाळणे अधिक सोपे वाटू लागेल, असे होणे संभव आहे का? असा बदल होणे शक्य आहे का?
प्रभुणे महाराज – हो. अशी अनेक उदाहरणे आहेत. काही साधक दिक्षेपूर्वी कांदा व लसूणाशिवाय जगूच शकत नव्हते. त्यांना आता कांदालसूणाचा वासही सहन होत नाही. त्यामुळे साधकाने साधनेला नियमितपणे बसणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. इतर सर्व गोष्टींची काळजी जागृत झालेली प्राणशक्ती घेईल.
संपादक – ही गोष्ट प्रोत्साहन देणारी आहे. मला खात्री आहे की या क्रांतिकारी बदलामुळे अनेक साधकांना महायोगाचा लाभ घेता येईल. अनेकजण महायोग शिकण्याचा प्रयत्न करण्यास उद्युक्त होतील कारण त्यांना कठीण वा अशक्य वाटणारे निर्बंध पाळण्याची कबुली देण्याची गरज वाटणार नाही. आता पुन्हा आपण महायोगाच्या वैश्विक सभेकडे वळूया. ही सभा १ ते ३ मे २०१२च्या दरम्यान पुणे येथे आयोजित केली आहे. तुम्ही आधी म्हणाला होतात की तुम्हाला विश्वभरातून आलेल्या श्रोत्यांना महायोगाबद्दल सांगायचे आहे. यामुळे या पृथ्वीतलावरील प्रत्येकाला महायोगापासून मिळणाऱ्या फायद्यांविषयी माहिती मिळेल व समजेल की हे सर्व कोणतीही किंमत न मोजता उपलब्ध आहे. पण मला नवल वाटते की या सभेसाठी जगभरातील लोकांना पुण्याला कशाला बोलावयाचे? महायोगाचा प्रसार

वैश्विक स्तरावर नेण्यासाठी इंटरनेटसारखी इतरही साधने वापरायला काय हरकत आहे?

गुरूदेव - हं! आम्ही इन्टरनेटच्या व इतर साधनांच्या सहाय्याने महायोगाचा वैश्विक प्रसार करतोच आहोत. माझ्या मनात असा विचार आला की आपण आपले जेवण घेऊन जेवतोच पण सर्वजण येऊन एकत्रपणे जेवलो तर? तुम्हाला असे वाटत नाही का, आपण सर्व महायोगाचे साधक एकत्र आलो तर मजा येईल? मला वाटले की, वेगवेगळ्या देशातून महायोगाचे साधक जमलो तर आपली सामुहिक भावना वृद्धींगत होईल. आपणास जेष्ठ निष्ठावान साधकांचे महायोगाच्या विविध अंगांबद्दल विचार ऐकावयास मिळतील, आपसात कल्पनांची देवाणघेवाण करता येईल, एकमेकांचे अनुभव ऐकावयास मिळतील आणि या विश्वाचे नागरिक म्हणून एकत्रितपणे साधनेस बसू शकू.

मला हे जग म्हणजे एकच समूह वाटतो. ते एकच कुटुंब आहे असे वाटते. 'वसुधैव कुटुंबकम' 'वसुधा' म्हणजे हे जग, 'कुटुंब' म्हणजे घर. हे जग म्हणजे एकच देश आहे. पृथ्वीवरील विविध समुद्रांमुळे भूप्रदेशाला एक प्रकारच्या सीमारेषा घातल्या गेल्या आहेत. परंतु एखाद्याने या गोष्टीचा विचार केला की या ग्रहावरील आपण सर्वजण एकाच हवेत श्वसन करतो आणि जर हवा सीमारेषा निर्धारीत करीत असेल तर आपण सर्वजण एकाच देशाचे नागरिक आहोत, एकाच कुटुंबाचे सदस्य आहोत, एकाच मातेची बाळे आहोत – हवा जी माताशक्ती वा प्राणशक्तीला व्यक्त स्वरुपात आणते. मला आशा आहे की वैश्विक सभेला जे उपस्थित असतील त्यांना या सभेत सहभाग घेत असताना ही विश्वबन्धुत्वाची भावना अनुभवता येईल.

मला आणखी अशी आशा आहे की, जगभरातून आलेले सहभागी साधक या सभेत घेतलेले अनुभव व इथे मिळालेली शिकवण घेऊन आपापल्या देशात जातील, तेथील समाजात मिसळतील तेव्हा महायोगाच्या संदेशाचा प्रसार

करतील. अशा प्रकारे महायोगाची माहिती ज्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचली होती, ती संख्या शतगुणित होईल.

प्रभुणे महाराज – तसेच साधकांना प.पू.काकामहाराज उपस्थित असताना साधनेस बसण्याची संधी मिळेल.

गुरूदेव – ते महत्वाचे नाही. मुख्य मुद्दा असा की जरी आपल्या सर्वांमध्ये विविध अंतर असले तरी आपण सर्व एकच आहोत. जेव्हा आपण महायोगासारख्या शास्त्राचा अभ्यास करतो तेव्हा हे एकत्व प्रत्यक्ष अनुभवतो. आम्हाला शिष्यपरंपरा तयार करण्यात काही स्वारस्य नाही. हे जग, हे विश्व ज्या सामायिक शक्तीतत्वावर आधारीत आहे, तिचा प्रत्येकाने अनुभव घ्यावा अशी आमची इच्छा आहे. याचा धर्माशी काही संबंध नाही. खर म्हणजे आम्ही साधकांना त्यांचा धर्म बदलण्यापासून परावृत्त करतो. महायोगाच्या सरावाने त्या साधकाला स्वत:चा धर्म अधिक नीट समजेल आणि ज्या देवतेची तो आराधना करतो तिचा प्रत्यक्ष अनुभव येऊ शकेल.

संपादक – प्रिय गुरूदेव व प्रभुणे महाराज ह्या सर्व प्रश्नांवर आपण सविस्तर चर्चा केलीत, आपला अमूल्य वेळ दिलात त्याबद्दल मनापासून धन्यवाद! मला खात्री आहे की, ‘सेल्फ अवेकनिंग’च्या वाचकांना तुम्ही दोघांनी प्रसाराविषयी जे मार्गदर्शन केलेत ते खरोखर आवडेल. तसेच या पृथ्वीतलावरील प्रत्येकासाठी महायोगासारखी दैवी देणगी उपलब्ध आहे ही माहितीसुद्धा आवडेल. आपल्या सोबत बसून आपला उत्साहवर्धक संदेश ऐकणे हा व्यक्तिश: मला प्रासादिक अनुभवच आहे.

गुरूदेव – या पृथ्वीवरील सर्वांचा - सामायिक माता असलेल्या बंधुभगिनींचा उध्दार होवो, अशी मी माझ्या गुरूदेवांच्या चरणी प्रार्थना करतो !

**दिलीप कामत**

मूळ इंग्रजी चर्चेचा मराठी अनुवाद - सौ. सीमा पितळे